**सांस्कृतिक कार्यक्रमाचे उद्‌घाटन** दि.२२/०८/२०२४


दि.२२/०८/२०२४ रोजी सांस्कृतिक कार्यक्रचे उद्‌घाटन सोहळयाचे आयोजन करण्यात करण्यात आले.सर्वप्रथम बॅरि.वानखेडे साहेबांच्या प्रमिमेचे पूजन करण्यात आले.कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी महाविद्यालयाचे प्राचार्य,डॉ.एम.व्ही.कोल्हे.तर उदघाटक म्हणून पंढरीनाथ महाविद्यालय,नरखेड येथील प्राचार्य,डॉ.विजय राऊत,प्रमुख पाहुणे डॉ.प्रमोद वडते या मान्यवरांच्या हस्ते प्रतिमा पूजन करण्यात आले.व त्यानंतर मान्यवरांचे स्वागत करण्याते आले.प्रास्ताविक सांस्कृतिक विभागप्रमुख डॉ.विनोद यू.भालेराव यांनी सांस्कृतिक कार्यक्रमाची भूमिका विशद करतांना म्हणाले की,सांस्कृतिक कार्यक्रमाचे उदघाटन आपण दर वर्षाला घेत असतो.ते यासाठी की,नवीन प्रवेशित विद्यार्थ्यांना आपल्या महाविद्यालयीन परंपरेची आणि सांस्कृतिक परंपरेची कार्यक्रमातून ओळख व्हावी व त्यांना हक्काचे व्यासपीठ मिळावे, आपल्या अंगामध्ये जे काही सुप्त कला गुण असतात.त्या सुप्त कला गुणांना वाव देणारे व्यासपीठ म्हणजे सांस्कृतिक विभाग होय,या विभागाअंतर्गत जे वर्षभर उपक्रम राबविल्या जातात,म्हणजेच,जयंती,पुण्यतिथी,वैचारिक कार्यक्रम इ. अशा विविध उपक्रमाच्या मांदियाळीचे आयोजनाची रेलचेल सांस्कृतिक विभागाच्या माध्यमातून केले जाते. उद्घाटक म्हणून प्राचार्य.डॉ. विजय राऊत यांनी सारकृतिक विभागाचे उद्घाटन रीतसर झाले,असे जाहीर करुन विद्यार्थ्यांना शालेय जीवनापासून तर महाविद्यालयीन जीवनाचा बदलता प्रवास आणि या परिवर्तनीय प्रवासामध्ये सांस्कृतिक विभागाचे महत्व हे अबाधित आहे.याचे कारण गायन वादन,नृत्य,नाटक,पाककला,शिल्पकला,हस्तकला,अशा विविध कलांना प्रोत्साहन आणि व्यासपीठ उपलब्ध करुन देण्याचे काम सांस्कृतिक विभाग सातत्याने करीत असतात.त्यामुळे प्रत्येक विद्यार्थ्यानी वर्षभर होणाऱ्या कार्यक्रमामध्ये सहभाग घेतला पाहिजे आणि आपले जीवन समृध्द केले पाहिजे.अशा प्रकारे उदघाटनपर मार्गदर्शन करतांना विद्यार्थ्यांशी सुसंवाद साधला.

व्यासपीठावर प्रमुख पाहुणे म्हणून म्हणून महाविद्यालयाचे जेष्ठ प्राध्यापक डॉ.प्रमोद वडते म्हणाले की,‘महाराष्ट्राची सांस्कृतिक परंपरा फार प्राचीन आहे,प्राचीन काळापासून विविध कलांचा वारसा सांगणारी त्यामुळे सांस्कृतिक विभाग हा,विद्यार्थ्याच्या स्वप्नाला पूर्णत्वास नेणारा विभाग म्हणजे सांस्कृतिक विभाग होय.अशा प्रकारच्या त्यांनी शुभेच्या दिल्या.

प्राचार्य
बॅरि. शेषराव वानखेडे
महाविद्यालय,मोहपा

कार्यक्रमाचे अध्यक्ष महाविद्यालयाचे प्राचार्य,डॉ.एम.व्ही.कोल्हे आपल्या अध्यक्षीय भाषणातून प्राचीन काळातील कलेपासून तर आधुनिक काळातील कलेचा इतिहास हा किती गौरवशाली आहे. याचा वेध घेवून या कलेला पुन्हा नव्याने विकसित करण्याचे काम सांस्कृतिक विभाग करीत असतात.मग ते आदीवासी नृत्य,गोंडी नृत्य,पासून तर आजच्या सिनेमासृष्टीतील काम करणारे आधुनिक कलाकार असो,या सर्वांनी महाराष्ट्राचा सांस्कृतिक एकोपा टिकविण्याचे काम आपल्या संस्कृतिने केले आहे.अशा प्रकारे विविध दृष्टांत देवून अध्यक्षीय भाषणातून सर्वांना मार्गदर्शन केले.

कार्यक्रमाला प्रामुख्याने उपस्थित असलेले,डॉ.अजित जाचक,डॉ.धनंजय देवते,डॉ. अलका थोडगे,प्रा.शैलेश हातबुडे,प्रा.अनिता गणोरकर,प्रा.पवन उमप,श्री.संजयराव गणोरकर,शुभम वाघ,चैतन्य सुपले,हरिष अंजनकर,रजनी अकर्ते,प्रदीप बगडे,अरविंद डहाट,प्रकाश कोकोडे,आणि महाविघालयीन विद्यार्थी मोठया संख्येने अपस्थित होते.कार्यक्रमाचे सूत्र संचालन प्रा.सिध्दार्थ चनकापूरे, तर आभार प्रा.सचिन काळे यांनी माणून कार्यक्रमाची सांगता करण्यात आली.






प्रा डॉ विनोद यू भालेराव (सांस्कृतिक विभाग प्रमुख)
बॅरी शे. वा. महा. मोहपा

प्राचार्य
बॅरि. शेषराव वानखेडे
महाविद्यालय, मोहपा

दैनिक जनप्रभात
सामाजिक परिवर्तनाचा बुलंद आवाज

# शिक्षणाशिवाय प्रगती नाही : प्राचार्य, डॉ. कोल्हे



**नागपूर ■ दिलीप येवले**

बॅरि. शेषराव वानखेडे महाविद्यालयात, मोहपा येथे शुक्रवार, दिनांक २१/०३/२०२५ ला बी.ए आणि एम.ए. अंतिम वर्षाच्या विद्यार्थ्यांसाठी निरोप समारंभाचे आणि विद्यापीठाच्या उन्हाळी परीक्षेकरिता शुभेच्छा पर कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. एम. व्ही. कोल्हे होते. त्यांनी विद्यार्थ्यांना मार्गदर्शन करताना प्रगतीचा मार्ग हा शिक्षणातूनच जात असतो. काळ कोणताही असो ज्या विद्यार्थ्यांना आपला भविष्यकाळ घडवायचं असेल त्यांनी आपले लक्ष शिक्षणाकडे केंद्रित केले पाहिजे असे विचार विशद केले. कार्यक्रमाचे प्रमुख पाहुणे माजी इतिहास विभागप्रमुख डॉ. संजय ठवळे हे होते. त्यांनी विद्यार्थ्यासोबत संवाद साधताना म्हणाले की, विद्यार्थ्यांनी ज्ञानग्रहण करावे. पण सोबतच माणुसकी मात्र विसरू नये. कितीही गगन भरारी घेतली तरी,आपले सदैव पाय जमिनीवर ठेवले पाहिजे, असे विचार विशद केले. याप्रसंगी डॉ. प्रमोद वडते, डॉ. लीलाधर खरपुरिये, डॉ. धनंजय देवते, डॉ. अलका थोडगे, प्रा. हातबुडे, प्रा. चणकापुरे, प्रा. काळे, प्रा. उमप तसेच विद्यार्थी वर्ग समीक्षा डहाट, रेश्मा इरपाची, पल्लवी इरपाची, सानिया पुरी, ओम निंबाळकर, सावण उके या विद्यार्थ्यांनी सुद्धा बोलक्या प्रतिक्रिया व्यक्त केल्या. कार्यक्रमाचे प्रास्ताविक सांस्कृतिक विभाग प्रमुख डॉ. विनोद भालेराव यांनी केले. सूत्रसंचालन आर्या कळसाईत तर आभार मेहक शेख या विद्यार्थिनीने मानले. कार्यक्रमाच्या यशस्वीते करिता संजयराव गणोरकर, शुभम वाघ, चैतन्य सुपले, हरीश अंजनकर, प्रदीप बगडे, अरविंद डहाट, प्रकाश कोकोडे, आदींनी सहकार्य केले.


Principal
Bar.Sheshrao Wankhede
Mahavidyalaya,Mohpa


Principal
Bar.Sheshrao Wankhede
Mahavidyalaya,Mohpa

## लोकशाहीची जतन करणे काळाची गरज

दि. 14/ 4/ 2024 रविवार भारतीय राज्यघटनेचे शिल्पकार भारतरत्न डॉ बाबासाहेब आंबेडकर यांची 133 वी जयंती बॅरि. शेषराव वानखडे महाविद्यालय मोहपा येथे मोठ्या उत्साहात साजरी करण्यात आली. डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी दिलेल्या संविधानामुळे स्वातंत्र्य,समता, बंधुता आणि सामाजिक व आर्थिक न्याय या मूल्यांची जोपासना केली तरच देशाची लोकशाही जिवंत राहील. लोकशाहीच्या उज्वल भवितव्यासाठी व्यक्तिपूजा टाळावी लागेल. तसेच सामाजिक लोंढा एखाद्या मंदिराकडे न जाता ग्रंथालय कडे मात्र वळला तरच मानवी विकास होईल असे प्रतिपादन इतिहास विभागाचे माजी विभाग प्रमुख डॉ. ठवळे आयोजित कार्यक्रमात ते बोलत होते.

बाबासाहेबांनी स्त्री पुरुष समानतेचा मंत्र दिल्यामुळे आज देशात महिला सर्व क्षेत्रांमध्ये आपले नाव लौकिक करीत आहेत. त्यांनी सर्वजण हिताय सर्वजण सुखाय! असे तत्त्वज्ञान मांडले. त्यांनी सर्व स्तरातील घटकांना न्याय मिळवून दिला. माणूस म्हणून जगण्याचा हक्क दिला, असे विचार अध्यक्षीय भाषणातून महाविद्यालयीन प्राचार्य डॉ. एम. व्ही. कोल्हे यांनी मांडले. याप्रसंगी डॉ. प्रमोद वडते व अनेक विद्यार्थ्यांनी सुद्धा आपले मनोगत विशद केले. कु. ज्ञानेश्वरी काथवटे, कु. मानसी देशभ्रतार, प्रा. सचिन काळे, प्रा. सिद्धार्थ चनकापुरे प्रा. शैलेश हातबुडे प्राध्यापिका अनिता गणोरकर, डॉ. लीलाधर खरपुरीये यांनी डॉ. बाबासाहेब आंबेडकरांच्या जीवन कर्तृत्वावर प्रकाश टाकला. या कार्यक्रमाला डॉ अजित जाचक, डॉ धनंजय देवते श्री संजयराव गणोरकर,चेतन सुपले, श्री हरीश अंजनकर,श्री प्रदीप बगडे, श्री अरविंद डहाट, श्रीमती रजनी अकर्ते उपस्थित होते. तसेच विद्यार्थी सुद्धा मोठ्या प्रमाणात उपस्थित होते. कार्यक्रमाचे प्रास्ताविक सांस्कृतिक विभाग प्रमुख डॉ. विनोद भालेराव तर सूत्रसंचालन आणि आभार कु. आर्या कळसाईत हिने मानून कार्यक्रमाची सांगता करण्यात आली.





Bar. Sheshrao Wankhade Mahavidyalaya Mohpa 1991

डॉ. मा. वि. कोल्हे
प्राचार्य,
बॅरि शेषराव वानखेडे महाविद्यालय,
मोहपा, जि. नागपूर.

# अहवाल

बॅरि. शेषराव वानखेडे महाविद्यालय मोहपा येथे शनिवार दिनांक 15 /11 /2025 रोजी भगवान बिरसा मुंडा यांच्या जयंतीच्या कार्यक्रमाचे आयोजन केले होते. कार्यक्रमाचे अध्यक्ष महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. अलका थोडगे यांनी महापुरुषांचे जीवन किती त्यागी आणि ध्येयवादी होते त्यातून आपण प्रेरणा घेतली पाहिजे व समाजामध्ये आपली स्वतःची ओळख निर्माण केली पाहिजे .अशा प्रकारचे विचार भगवान बिरसा मुंडा यांच्या जीवन चरित्रातून घेतले पाहिजे. अशा प्रकारचा आशावादी विचार डॉ. थोडगे यांनी आपल्या अध्यक्षीय भाषणातून विशद केला. कार्यक्रमाचे प्रमुख अतिथी डॉ. प्रमोद वडते. यांनी. आदिवासी समाज इतर प्रवाहापासून कसा वेगळा होता तरीसुद्धा भगवान बिरसा मुंडा यांनी आपल्या आदिवासी समाजाला एकत्र करून त्यांच्यात क्रांतिकारी विचारांची रोवन करणे किती कठीण काम होते. हे करण्याचे धाडस भगवान बिरसा मुंडा यांनी केले.त्यामुळे आजचा आदिवासी वर्ग हा त्यांच्याच प्रेरणेतून स्वतःची प्रगती करतो आहे. असे परखड मत डॉ.प्रमोद वडते यांनी आपल्या भाषणातून विद्यार्थ्यासमोर मांडले. तसेच डॉ. लीलाधर खरपूरिये यांनी लढवय्या बिरसा मुंडा, हा आधुनिक विचारांना आत्मसात करणारा होता.

म्हणूनच त्यांनी आपल्या समाजाला ब्रिटिशांच्या गुलामगिरीतून सोडवण्याची ताकद आणि विचार पुरविण्याचे काम भगवान बिरसा मुंडा यांनी केले त्यांचे कार्यकर्तृत्व आपल्या सर्वांना प्रेरणा देणारे आहे अशा प्रकारचा एक आशावाद डॉ. खरपुररिये यांनी विद्यार्थ्यासमोर उलगडून दाखविला. कार्यक्रमाचे प्रास्ताविक सांस्कृतिक विभागाचे प्रमुख डॉ .विनोद भालेराव. यांनी आजचा विद्यार्थी हा व्हाट्सअप आणि फेसबुकच्या युगामध्ये तल्लीन झालेला आहे म्हणून त्यांनी भगवान बिरसा मुंडा यांचे विचार विद्यार्थ्यांनी ऐकले पाहिजे वाचले पाहिजे, म्हणूनच अशा कार्यक्रमाचे आयोजन होणे हे महाविद्यालयीन तरुणासाठी वैचारिक मेजवानी आहे.

Athodge

Principal
Bar.Sheshrao Wankhede
Mahavidyalaya,Mohpa


कार्यक्रमाच्या यशस्वीते करिता डॉ. धनंजय देवते, प्रा. सचिन काळे, प्रा. सिद्धार्थ चनकापुरे, प्रा. शुभम वाघ, श्रीमती कल्पना देवळे, हरीश अंजनकर, रजनी अकर्ते, प्रदीप बगडे, अरविंद डहाट, प्रकाश कोकोडे व विद्यार्थी संख्या मोठ्या प्रमाणात उपस्थित होते,

कार्यक्रमाचे सूत्रसंचालन प्रा. अनिता गणोरकर यांनी केले तर आभार प्रा .पवन उमक यांनी मानले व राष्ट्रगीताने कार्यक्रमाची सांगता करण्यात आली.









Principal
Bar. Sheshrao Wankhede
Mahavidyalaya, Mohpa

# अहवाल

बॅरि. शेषराव वानखेडे महाविद्यालय मोहपा येथे बंकिमचंद्र चटोपाध्याय यांनी 'आनंदमठ' या कादंबरीतील 'वंदे मातरम' या लिहिलेल्या गीतास 07 नोव्हेंबर 2025 रोजी 150 वर्षे पूर्ण झालेले असल्यामुळे, ऐतिहासिक आणि सांस्कृतिक दृष्टीने या कार्यक्रमाचे महत्त्व फार आगळे वेगळे आहे. याविषयी सांस्कृतिक विभागाचे प्रमुख डॉ. विनोद भालेराव यांनी बंकिमचंद्र चटोपाध्याय यांच्या साहित्याची ओळख विद्यार्थ्यांना करून दिली. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. अलका थोडगे यांनी 'वंदे मातरम' हे गीत कसे राष्ट्र प्रेमाने ओत प्रोत भरलेले असून मानवाला माणूस म्हणून जगण्याचे एक नैतिक बळ दिल्या जाते. अशा प्रकारचा या गीताचा आशय विद्यार्थ्यांसमोर उलगडून दाखविला.

1) 15/10/25 'आनंदमठ' या कादंबरीतील सामाजिकता या विषयावर प्रा. सिद्धार्थ चनकापूर यांनी प्रकाश टाकला. व विद्यार्थ्यांनी सुद्धा 'आनंदमठ' या कादंबरीतील आशयावर आपापली मते व्यक्त केली.


2)16/10/25 ला 'आनंदमठ' या कादंबरीतील निवेदनशैली यावर डॉ. लीलाधर खरपुरिये, यांनी प्रकाश टाकून विद्यार्थ्यांना मंत्रमुग्ध केले.

3) 17/10/25 ' वंदे मातरम' हे गीत सर्व विद्यार्थ्यांनी व शिक्षक - शिक्षकेतर कर्मचाऱ्यांनी एका स्वरात गाऊन कार्यक्रमाची सांगता राष्ट्रगीताने करण्यात आली.

कार्यक्रमाला प्रामुख्याने उपस्थित असलेले डॉ. प्रमोद वडते, डॉ. अजित जाचक, डॉ. धनंजय देवते, प्रा. अनिता गणोरकर, प्रा. शैलेश हातबु,डे प्रा. संजय ठवळे, प्रा. शुभम वाघ, श्रीमती कल्पना देवळे, श्री. हरीश अंजनकर, श्रीमती रजनी अकर्ते, प्रदीप बगडे, अरविंद डहाट, प्रकाश कोकोडे व विद्यार्थी वर्ग मोठ्या संख्येने उपस्थित होते. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन प्रा. सचिन काळे, आभार प्रा. पवन उमक यांनी मानले





Principal
Bar.Sheshrao Wankhe
Mahavidyalaya,Mohpa

## अहवाल

बॅरि. शेषराव वानखेडे महाविद्यालय, मोहपा येथे दिनांक 5 फेब्रुवारी 2025 ला संविधान गौरव महोत्सव अंतर्गत "भारतीय राज्यघटनेची ओळख" या विषयावर कार्यक्रम घेण्यात आले. या कार्यक्रमाचे प्रमुख वक्ते प्रा. डॉ. विनोद भालेराव होते. तर अध्यक्ष महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. एम. व्ही. कोल्हे होते. डॉ. भालेराव यांनी आपल्या मार्गदर्शनात 26 नोव्हेंबर 1949 रोजी भारतीय राज्यघटनेचा मसुदा स्वीकारण्यात आला. या घटनेला 26 नोव्हेंबर 2024 रोजी 75 वर्षे पूर्ण झाली आहेत. 26 जानेवारी 1950 रोजी भारतीय राज्यघटना अमलात आली. आपल्या राज्यघटनेला 26 जानेवारी 2025 ला 75 वर्षे पूर्ण झाली आहेत. भारतीय राज्यघटनेने भारताला एक सार्वभौम, लोकशाही, प्रजासत्ताक म्हणून स्थापित केले आहे. भारताच्या या ऐतिहासिक परिवर्तनात्मक क्षणाचा सन्मान करण्यासाठी संविधान गौरव महोत्सवाचे आपण आयोजन केले आहे असे विचार विशद केले. तर कार्यक्रमाचे अध्यक्ष प्राचार्य डॉ. एम. व्ही. कोल्हे यांनी समानतेचा हक्क या विषयावर विद्यार्थ्यांशी संवाद साधला. राज्य कोणत्याही व्यक्तीस भारताच्या राज्यक्षेत्रात कायद्यापुढे समानता अथवा कायद्याचे संरक्षण नाकारत नाही. राज्य कोणत्याही नागरिकांना प्रतिकूल होईल अशा प्रकारे केवळ धर्म, वंश, जात, लिंग, जन्मस्थान अथवा यापैकी कोणत्याही कारणावरून भेदभाव करण्यास मनाई करते,असे विचार विशद केले या कार्यक्रमाला महाविद्यालयाचे प्राध्यापक डॉ. प्रमोद वडते, डॉ. संजय ठवळे, डॉ. अजित जाचक, डॉ. धनंजय देवते, डॉ. लीलाधर खरपुरिये, डॉ. अलका थोडगे, प्रा. सचिन काळे, प्रा. सिद्धार्थ चनकापुरे, प्राध्यापक शैलेश हातवुडे, प्राध्यापक अनिता गणोरकर व सर्व विद्यार्थी उपस्थित होते. कार्यक्रमाच्या यशस्वीतेसाठी शिक्षकेतर कर्मचारी श्री शुभम वाघ, श्री अजय अंजनकर, चेतन सुपले, प्रदीप बगडे, अरविंद डहात, प्रकाश कोकोडे, रजनी गणोरकर यांनी सहकार्य केले. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन बी.ए. 2 ची विद्यार्थिनी कु. आर्या कळसाईत हिने केले तर आभार प्राध्यापक पवन उमक यांनी मांडले.

Bar. Sheshrao Wankhade Mahavidyalaya Mohpa 1991

प्राचार्य
बॅरि. शेषराव वानखेडे
महाविद्यालय, मोहपा







तसेच गुरुवार दिनांक 13 फेब्रुवारी 2025 ला संविधान गौरव महोत्सव याविषयी कार्यक्रम घेण्यात आले. या कार्यक्रमाचे अध्यक्ष महाविद्यालयाचे माजी प्रा. डॉ. संजय ठवळे होते. तर प्रमुख वक्ते डॉ. लीलाधर खरपुरिये होते. त्यांनी आपल्या व्याख्यानातून भारतीय संविधानाची महती विशद केली. कार्यक्रमाचे अध्यक्ष यांनी संविधान निर्मितीचा इतिहास उलगडून दाखविला. याप्रसंगी महाविद्यालयाचे प्राध्यापक डॉक्टर अलका थोडगे, सिद्धार्थ चणकापुरे, शैलेश हातबुडे, पवन उमक यांनी मार्गदर्शन केले. या कार्यक्रमाला सर्वच विद्यार्थी उपस्थित होते. या कार्यक्रमाच्या यशस्वीतेसाठी महाविद्यालयातील सर्वच प्राध्यापक व शिक्षकेतर कर्मचारी यांनी सहकार्य केले.








दिनांक 18 फेब्रुवारी 2025 ला बॅरि. शेषराव वानखेडे महाविद्यालय मोहपा ग्रंथालय विभागाच्या वतीने संविधान गौरव महोत्सव अंतर्गत कार्यक्रम घेण्यात आले. या कार्यक्रमात निमित्य ग्रंथपाल डॉ. धनंजय देवते यांनी ग्रंथालय व वाचनाचे महत्त्व आपल्या व्याख्यानातून विशद केले.

Bar. Sheshrao Wankhade Mahavidyalaya Mohpa 1991

प्राचार्य
बॅरि. शेषराव वानखेडे
महाविद्यालय, मोहपा.

वाचनाने माणसाच्या व्यक्तिमत्त्वात कसा बदल घडवून येतो याविषयी विद्यार्थ्यांना माहिती दिली. या कार्यक्रमाला सर्वच शिक्षण, शिक्षकेतर कर्मचारी व विद्यार्थी उपस्थित होते.




Bar. Sheshrao Wankhade Mahavidyalaya
Mohpa
1991

प्राचार्य
बॅरि. शेषराव वानखेडे
महाविद्यालय, मोहपा




मोहपा शिक्षण मंडळ,


मोहपा शिक्षण मंडळ, मोहपा द्वारा संचालित
बॅरि. शेषराव वानखेडे महाविद्यालय, मोहपा
जि. नागपूर


मोहपा शिक्षण मंडळ, मोहपा द्वारा संचालित
बॅरि. शेषराव वानखेडे महाविद्यालय, मोहपा
जि. नागपूर


मोहपा शिक्षण मंडळ, मोहपा द्वारा
जि. नागपूर


मोहपा शिक्षण मंडळ, मोहपा द्वारा संचालित
बॅरि. शेषराव वानखेडे महाविद्यालय, मोहपा
जि. नागपूर


मोहपा शिक्षण मंडळ, मोहपा द्वारा संचालित
बॅरि. शेषराव वानखेडे महाविद्यालय, मोहपा
जि. नागपूर


मोहपा
गणेश बळवंत पंडे स्मृति शैक्षणिक संकुल


डॉ. अ.अ. बोडगे
प्राचार्य












गणेश बळवंत पंडे स्मृति शैक्षणिक संकुल